**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती ॲड.हुस्नबानू खलिफे )**

**<u>शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याबात</u>**

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, राज्यात अभुतपूर्व दुष्काळाची परिस्थिती निर्माण झालेली आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या दिवसेंदिवस वाढत आहेत. अधिवेशन सुरु झाल्यापासून शेतकऱ्यांना मदत मिळालीच पाहिजे, अशी ठाम भूमिका विरोधी पक्षाच्या वतीने दोन्ही सभागृहात मांडण्यात आली. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मदत मिळालीच पाहिजे, कर्जमाफी झालीच पाहिजे, या भूमिकेचा आम्ही अधिवेशनाच्या पहिल्या आठवड्यात सातत्याने आग्रह धरला. कर्जमाफी तर सोडाच, परंतु दीर्घकालीन योजनेच्या नावाखाली शासनाने फसवे पॅकेज जाहीर केले आणि आम्हाला केंद्र शासनाकडून देखील मदत मिळणार आहे, अशा प्रकारचा आशावाद राज्य शासनाच्या वतीने दोन्ही सभागृहात दाखविण्यात आला. आता पर्यंत मागील 15 वर्षात ज्या ज्यावेळी राज्यात नैसर्गिक आपत्ती आली त्या त्यावेळी केंद्राचे पाहणी पथक महाराष्ट्रात आले आणि महाराष्ट्राला तातडीने त्या त्यावेळी मदत मिळत गेली. यावेळी देखील महाराष्ट्रात तीन वेळा केंद्राचे पाहणी पथक आले. परंतु, महाराष्ट्राच्या इतिहासातील दुर्दैवाची बाब अशी आहे की, त्यांना दिवसा शेतकऱ्यांच्या शेतीची पाहणी करता आली नाही. म्हणून रात्री अंधारात काही वेळा बॅटरी लावत तर काही वेळा मोबाईलच्या प्रकाशात राज्यातील शेतकऱ्यांची स्थिती शोधण्याचा, पाहण्याचा केविलवाणा प्रयत्न केंद्राच्या पाहणी पथकाने केला. ही बाब महिना दिड महिन्यापूर्वी घडलेली आहे.

सभापती महोदय, राज्य शासनाच्या दृष्टीकोनातून लाजिरवाणी बाब हीच आहे की, काल परवा माननीय केंद्रीय गृहमंत्री श्री.राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या समितीने देशातील वेगवेगळ्या राज्यांना मदत राहीर केली. परंतु, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना केंद्र शासनाच्या माध्यमातून एका रुपयाची देखील मदत मिळाली नाही. या निमित्ताने आम्ही आज केंद्र शासनाचा धिक्कार करतो, निषेध करतो. आज राज्य सरकारचे वजन केंद्रात संपुष्टात आले की काय, अशा प्रकारची संतप्त भावना या निमित्ताने राज्यातील शेतकऱ्यांच्या मनात निर्माण झालेली आहे. या सरकारला सत्तेवर राहण्याचा अधिकार तर राहिलेलाच नाही. परंतु, त्याच बरोबर शेतकऱ्यांच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मूलभूत प्रश्नांसाठी केंद्र शासनाकडे जाऊन, या सर्व गोष्टींचे भीषण वास्तव त्यांच्या निदर्शनास

..2...



श्री.सुनील तटकरे.......

आणून शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्याच्या दृष्टीकोनातून हे सरकार अपयशी ठरले आहे. तुम्ही एखादी निवडणूक आल्यानंतर बिहार सारख्या राज्याला लाख दीड लाख कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर करु शकता आणि आज महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढलेल्या असताना महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना भारत सरकारच्या माध्यमातून एका रुपयाची, एका कवडीची सुद्धा मदत मिळत नाही, याचा आम्ही जाहीररीत्या धिक्कार करतो. आम्ही केंद्र सरकारचा धिक्कार करतो, निषेध करतो आणि या सर्व प्रकरणात अपयशी ठरलेल्या राज्य सरकारचा सुद्धा निषेध करतो. राज्य शासनाने विनाविलंब केंद्र शासनाकडून राज्यासाठी मदत मिळविलीच पाहिजे तोपर्यंत सभागृहाचे कामकाज होऊ नये, अशी आमची मागणी आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात सर्वात महत्वाचा विषय कोणता असेल तर तो शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा आहे. नापिकी, शेतकऱ्यांची आर्थिक अवस्था ढासळणे ही त्यामागील प्रमुख कारणे आहेत. राज्य शासन त्या दृष्टीकोनातून काही निर्णय घेईल आणि शेतकऱ्यांना दिलासा देण्याच्या दृष्टीकोनातून शेतकऱ्यांची कर्जमाफी करेल, अशी शासनाकडून अपेक्षा होती. राज्य शासनाने शेतकऱ्यांना मदत करावी, केंद्र शासनाने मदत करावी, हा प्रश्न आम्ही सातत्याने लावून धरला. परंतु, आपण बघितले की, काल दिल्ली येथे जी बैठक झाली त्या बैठकीत महाराष्ट्र वगळता इतर राज्यांना मदत देण्याच्या दृष्टीने निर्णय झाला. राज्य शासन आपल्या कामामध्ये कुचराई करीत आहे. राज्य शासनाकडून केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविला जात नाही. त्यामुळे राज्यातील महत्वाच्या प्रश्नांवर तेथे चर्चा होत नाही. अशा प्रकारे राज्य शासनाचे शेतकऱ्यांकडे पूर्णपणे दुर्लक्ष झालेले आहे. शासनाने शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले आहे. शेतकऱ्यांना मदत देण्याच्या दृष्टीकोनातून राज्य शासनाने कोणतेही पाऊल उचलले नाही. उलट, राज्य शासनाने केंद्र शासनाकडे या संदर्भात प्रस्ताव पाठविला पाहिजे आणि राज्यात जी स्थिती आहे ती केंद्र शासनाला अवगत करावयास पाहिजे. परंतु, राज्य शासन त्यामध्ये अपयशी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ठरलेले आहे. राज्यातील शेतकऱ्यांचे कर्जमाफ झाले पाहिजे, अशी मागणी आम्ही सातत्याने लावून धरली. परंतु, हे शासन शेतकऱ्यांचे कर्जमाफ करु शकले नाही आणि दिल्ली येथे जी बैठक झाली

..3...



श्री.माणिकराव ठाकरे........

त्या बैठकीत इतर राज्यांना मदत मिळाली. परंतु, आपल्या राज्याला एका पैशाची सुद्धा मदत मिळाली नाही. जोपर्यंत हे शासन शेतकऱ्यांची कर्जमाफी करीत नाही, केंद्र शासनाकडून कर्जमाफीसाठी आवश्यक असलेला निधी मिळत नाही किंवा राज्य शासन उपलब्ध करुन देत नाही तोपर्यंत कामकाज चालविण्यात काही अर्थ नाही. राज्य शासनाच्या अपयशाबद्दल, शेतकऱ्यांना कोणतीही मदत न दिल्याबद्दल, शेतकऱ्यांचे कर्जमाफ न केल्यामुळे विरोधी पक्ष म्हणून आम्ही शासनाचा जाहीर निषेध करतो. शासनाने शेतकऱ्यांची कर्जमाफी जाहीर करावी, तरच पुढील कामकाज होईल. अन्यथा तोपर्यंत संपूर्ण कामकाज थांबवावे आणि मुख्यमंत्री महोदयांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची घोषणा करावी, अशी आमची मागणी आहे.

**तालिका सभापती** : आता सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी बोलावे.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय,....

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी आपले म्हणणे मांडल्यानंतर मी आपल्याला बोलण्याची परवानगी देईन.

( विरोधी पक्षाचे काही सनमाननीय सदस्य आपल्या जागेवर उभे राहून घोषणा देतात.)

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, सनमाननीय सदस्य श्री.सुनील तटकरे.....

**तालिका सभापती** : सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 20 मिनिटांसाठी स्थगित करते.

( सभागृहाची बैठक सकाळी 10 वाजून 8 मिनिटांनी 20 मिनिटांकरिता स्थगित झाली.)

--------

..B-1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.नरेंद्र पाटील)**

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य उभे राहून जोराने एकत्र बोलण्याचा प्रयत्न करतात)

**तालिका सभापती** : कृपया सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे व शांत रहावे. सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांना अगोदर बोलू द्या.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय,

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय,

**तालिका सभापती** : मंत्री महोदय साहेब हो,

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या संदर्भातील प्रश्न उपस्थित झालेला आहे, मंत्री महोदयांनी सभापतीकडे पाहून असे बोलणे योग्य नाही.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी आपले म्हणणे मांडावे त्यानंतर मंत्री महोदय श्री.गिरीष बापट हे म्हणणे मांडतील.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, सभागृह स्थगित होण्या अगोदर मला तालिका सभापती यांनी बोलण्यास परवानगी दिली होती. सभापती महोदय,...

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मी पॉईंट ऑफ प्रोसिजरवर बोलण्यासाठी उभा आहे, सभागृहाचे कामकाज मघाशी तहकूब होताना सन्माननीय गट नेते श्री.शरद रणपिसे बोलण्यासाठी उभे राहिले होते. आता सभागृहाचे कामकाज सुरु झाल्यानंतर ते बोलण्यास परवानगी मागत होते, संसदीय कार्यमंत्री महोदयांचा बोलण्याचा हक्क जरूर आहे, त्यांनी सरकारच्यावतीने भावना मांडण्याबाबत दुमत असण्याचे काही कारण नाही. मनुष्यबळ एचआरडी सर्व शिक्षण खात्याचे मंत्री, सर्व शिक्षण म्हणजे मेडीकल एज्युकेशन, शालेय शिक्षण, तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण खात्याचे मंत्री महोदय, तावातावाने या ठिकाणी बोलतात. सन्माननीय जेष्ठ सदस्य हे गट नेते आहेत.

.....C-1..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे.......

त्यामुळे या ठिकाणी सभागृहात ज्येष्ठ मंत्री श्री.विनोद तावडे यांना आपण समज द्यावी. ज्या पध्दतीने त्यांनी सभागृहात वर्तन केले त्याबद्दल त्यांनी दिलगिरी व्यक्त करावी असा माझा पॉईंट ऑफ प्रोसीजरच्या माध्यमातून मुद्दा आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, ज्यावेळी गोंधळ होऊन सभागृहाची बैठक स्थगित होते, त्यानंतर पुन्हा सभागृह सुरु होत असताना माननीय विरोधी पक्षनेते किंवा माननीय संसदीय कार्यमंत्री यांचे पहिले वक्तव्य असले पाहिजे असे माझे मत आहे. त्यानंतर गटनेते श्री.शरद रणपिसे यांना बोलण्याची संधी देण्यात यावी. माननीय विरोधी पक्षनेत्यांना सभागृह स्थगित झाल्याबद्दल काय म्हणावयाचे आहे याबद्दल त्यांना बोलण्याची संधी दिली पाहिजे, हा माझा आग्रह होता. हा माझा अधिकार आहे, मला संरक्षण मिळाले पाहिजे.

**तालिका सभापती (श्री.नरेंद्र पाटील) :** मंत्री महोदय, गेल्या वेळीही याबद्दल चर्चा केली आहे. आपण खाली बसून काहीही वक्तव्य करु नये. आपण जबाबदार मंत्री आहात. आपल्याकडील खाते महाराष्ट्राला दिशा देणारे आहे. त्यामुळे आपणही काही गोष्टींचे पालन केले पाहिजे. माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी आपले म्हणणे मांडावे.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, धन्यवाद. हिवाळी अधिवेशन सुरु झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष व त्यांच्या सहकारी पक्षाकडून शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या संदर्भात पहिले एक-दोन दिवस सभागृहाचे कामकाज बंद पाडण्यात आले. आम्ही सभागृहाच्या कामकाजाबद्दल सहकार्य करण्याचा माननीय संसदीय कार्यमंत्र्यांना शब्द दिला होता. त्यानुसार सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक-58 वगळता इतर विधेयके मंजूर करण्यास सहकार्य केले. काल सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक-58 सभागृहात चर्चेला आले, त्यावेळेला आम्ही त्या विधेयकाला पाठिंबा जाहीर केला, विधेयकाला आम्ही सुचविलेली सुधारणा मागे घेतली. मेक इन इंडिया अभियानानुसार हे विधेयक मंजुरीसाठी मांडण्यात आले आहे. या विधेयकामध्ये बिल्डर, श्रीमंत वर्गाचे कसे भले होणार आहे याबद्दल आम्ही आमची भूमिका मांडली होती. बिल्डर, श्रीमंतांच्या विरोधात आमची भूमिका असेल तर ती स्वीकारण्यास सरकार तयार नाही. सरकार आम्हाला एवढेही सहकार्य देत नाही. म्हणून काल रात्री सभागृहाचे कामकाज बंद पडले. आम्ही

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे.......

शेतकऱ्यांचा मुद्दा मांडला. 21 डिसेंबर, 2015 रोजी डिझास्टर मॅनेजमेंट कमिटीची बैठक केंद्रीय गृहमंत्री श्री.राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली दिल्ली येथे झाली. राज्याचे अनेक प्रश्न आहेत. तुमचे खासदार त्या ठिकाणी आहेत. तुमच्या पक्षाचे अनेक खासदार दिल्लीत असताना तुमचा एकही प्रतिनिधी त्या बैठकीला गेला नाही. आम्ही सभागृहात मुद्दा मांडल्यानंतर सत्ताधारी पक्षाचे काही खासदार जातात आणि आम्ही श्री.राजनाथ सिंह यांना भेटू, माननीय पंतप्रधानांना भेटू असे म्हणतात. तुम्ही तुमच्या खासदारांचे शिष्टमंडळ अगोदरच माननीय पंतप्रधानांकडे पाठवावयास पाहिजे होते.

सभापती महोदय, राज्य सरकार या राज्यातील शेतकऱ्यांबद्दल संवेदनशील नाही, शेतकऱ्यांच्या आत्महत्यांबद्दल संवेदनशील नाही. सरकारला कामकाज उरकण्यासाठी आम्ही सहकार्य करु. आजच्या कामकाजपत्रिकेवरील कामकाज पार पाडण्यास मदत करु. परंतु विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या झालेल्या आत्महत्या विचारात घेऊन आम्ही कर्जमाफीची मागणी केली. केंद्र सरकारकडून किती पॅकेज येणार आहे, राज्य सरकारकडून काय आर्थिक मदत दिली जाणार आहे याबाबत आम्ही आमची भूमिका मांडली होती. आम्ही उर्वरित कामकाज पूर्ण करण्यास सहकार्य करु एवढे आश्वासन देतो.

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य सभागृहात घोषणा देत असतात)

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, आज सकाळी सभागृहाची विशेष बैठक सुरु झाल्यानंतर ठरल्याप्रमाणे नियम 260 चा प्रस्ताव चर्चेला पुकारण्यात आला. माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस या प्रस्तावावरील चर्चेत ऑन लेग आहेत. सभागृहाची विशेष बैठक दुपारी 11.45 वाजेपर्यंत घेण्यात येणार आहे. या प्रस्तावावरील चर्चेच्या अनुषंगाने संबंधित सहा विभागाच्या मंत्री महोदयांना उत्तर द्यावयाचे आहे. या प्रस्तावावर आणखी काही माननीय सदस्यांना आपले विचार मांडावयाचे आहेत. आपण सांगितल्याप्रमाणे वेळेचे ॲडजस्टमेंट करु. परंतु नवीन कुठला तरी विषय काढला जातो. तो विषय काढण्यास आमची हरकत नाही. त्यांना तो अधिकार आहे. परंतु सभागृहाचे कामकाज सुरु झाल्यानंतर मला असे वाटते की, विरोधी पक्ष वेळकाढूपणाचे धोरण घेत आहे.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात)

**तालिका सभापती** : मी सभागृहाची बैठक 30 मिनिटांकरिता तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी 10.35 ते 11.05 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----

..डी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगिती नंतर)**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.नरेंद्र पाटील)**

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी घोषणा देतात.)

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेत दुपारी 12.00 वाजेपर्यंत म.वि.प.नियम 260 अन्वये प्रस्ताव चर्चा व मंत्र्यांच्या उत्तरासह घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे. आज कुठल्याही परिस्थितीमध्ये नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चा संपवून मंत्र्यांना उत्तर देण्यास संधी दिली पाहिजे. ती संधी दिली नाही तर तो अन्याय होईल. एकतर्फी बेछूट आरोप करायचे आणि मंत्र्यांना बोलू द्यायचे नाही हे बरोबर नाही.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे त्यासंबंधी मी सांगू इच्छितो की, केंद्र सरकारच्या एनडीआरएफमध्ये प्रत्येक राज्यांकरिता नियतव्यय ठरलेला आहे. त्या नियतव्ययाच्या बाहेर ज्यांचा प्रस्ताव असतो त्याच्यांकरिता विशेष मान्यता लागते. आपल्या राज्यासाठी जवळ जवळ एक हजार कोटी रूपयांचा नियतव्यय होता. तो एनडीआरएफने ऑलरेडी दिलेला आहे. आता ज्या राज्यांचे प्रस्ताव आलेले आहेत, त्यांचा जो काही नियतव्यय होता त्यासंबंधातील प्रस्ताव आले आहेत. पण त्याच्या पलीकडे

.....(गोंधळ).....

जाऊन या राज्य सरकारचा प्रस्ताव एनडीआरएफच्या मान्यतेकरिता ठेवला आहे. त्याला कृषि विभागाने मान्यता दिलेली आहे. वित्त विभागाने मान्यता दिलेली आहे. तो प्रस्ताव आता केंद्रीय मंत्रिमंडळाच्या समितीपुढे गेलेला आहे. माननीय गृह मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली ती समिती आहे.

.....(गोंधळ).....

**तालिका सभापती :** सर्व सन्माननीय सदस्यांनी आपापल्या आसनावर जाऊन बसावे.

.....(गोंधळ).....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, देशामध्ये सर्वात मोठी मदत महाराष्ट्र राज्याला मिळणार आहे. मागच्या वर्षी देखील एनडीआरएफने या राज्याला सर्वात जास्त म्हणजे दोन हजार कोटी रूपयांची मदत दिलेली आहे. या पूर्वी एनडीआरएफने कधीही 700 कोटी रूपयांच्यावर मदत दिलेली नाही. मागच्या वर्षी केंद्र शासनाने दोन हजार कोटी रूपये दिलेले आहेत. विरोधकांना शेतकऱ्यांचे काही देणे घेणे नाही. त्यांनी जे बेछूट करून आरोप केले आहेत त्यासंबंधी उत्तर ऐकण्याची हिंमत त्यांच्यामध्ये नाही. म्हणून ते या ठिकाणी गोंधळ घालत आहेत. मी आजही सांगतो की, या राज्याला देशात सर्वात जास्त मदत एनडीआरएफच्या माध्यमातून मिळेल. त्याच्या पलीकडे जाऊन सांगतो की, आम्ही एनडीआरएफच्या मदतीकरिता थांबलेली नाही.

.....(गोंधळ).....

**तालिका सभापती :** सभागृहाची बैठक 15 मिनिटांकरिता स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक सकाळी 11.08 ते 11.23 वाजे पर्यंत स्थगित झाली.)

E-1.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य उभे राहून एकत्र बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**उप सभापती :** सन्माननीय सदस्यांनी सभागृहात शांतता राखावी.

श्री. गिरीष बापट : सन्माननीय सभापती महोदय,...

**उप सभापती :** मी सभागृहाचे कामकाज सुरु करीत असल्यामुळे मध्ये कोणीही बोलू नये. सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. सन्माननीय सदस्यांनी कृपया शांत बसावे. मी आता सभागृहाचे कामकाज सुरु करीत असल्यामुळे कृपया मध्ये कोणीही बोलू नये. (अडथळा) सभागृहात बिलकुल मस्करी चालणार नाही. सभागृह सुरु असताना सेन्स पाळला पाहिजे. हल्ली या गोष्टी वाढल्या आहेत. मी हे अजिबात खपवून घेणार नाही. मी आता सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे यांना बोलण्याची संधी देत आहेत. सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे यांचे बोलणे झाल्यानंतर सन्माननीय मंत्री श्री. गिरीष बापट यांना बोलण्याची मी संधी देणार आहे.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, आपण प्रथम सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे यांना बोलू द्यावे परंतु संसदीय कार्य मंत्री म्हणून मला सभागृहाला विनंती करावयाची आहे की, सभागृह सुरु झाले तेव्हा संसदीय कार्य मंत्री म्हणून मला कामकाजाच्या संदर्भात बोलावयाचे होते. परंतु मला बोलू दिले नाही. त्यावेळेस ओळीने सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे आणि सन्माननीय सदस्य श्री. शरद रणपिसे यांना बोलू दिले. या अगोदर सभागृह सुरु झाले तेव्हाही मला बोलण्याची संधी द्यावी अशी विनंती केली परंतु तेव्हाही मला बोलू दिले नाही. आपण सत्तारुढ पक्षाच्या मंत्र्यांना, संसदीय कार्य मंत्र्यांना बोलण्याची संधी न देता ओळीने विरोधी पक्षातील 5-5 सन्माननीय सदस्यांना संधी देणार असाल, आम्हाला आपला निर्णय मान्य आहे. परंतु हा निर्णय योग्य आहे का हे एकदा आपण तपासून बघावे.

**उप सभापती :** माझा तसा उद्देश नाही. मी फक्त....

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, सभागृह चालविण्याच्या संदर्भात मंत्र्यांना काही विचार व्यक्त करावयाचे असतात. आपण जो निर्णय द्याल तो मी मान्य करतो. मी एका मिनिटात खाली बसणार आहे. परंतु या ठिकाणी वारंवार असे होते आहे. याचा आपण विचार करावा एवढीच विनंती मी आपल्याला करतो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती :** ठीक आहे. मी आता पहिल्यांदा सन्माननीय सदस्य श्री. तटकरे यांना बोलण्याची संधी देणार असून त्यानंतर संसदीय कार्यमंत्र्यांना बोलण्याची संधी देणार आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज नियमाप्रमाणे सुरु असले पाहिजे याबाबत दुमत असण्याचे कारण नाही. काल उशिरा केंद्रसरकारकडून विविध राज्यांना आपत्तीच्या संदर्भात मदत जाहीर झाली. त्यात महाराष्ट्राला मदत न मिळाल्यामुळे महाराष्ट्रातील तमाम शेतकऱ्यांच्या संतप्त भावना, शेतकऱ्यांचे प्रतिनिधी या नात्याने आम्ही या ठिकाणी मांडल्या. आज सकाळी विशेष बैठक सुरु झाली त्यावेळेस सुध्दा त्याच भावना आम्ही या ठिकाणी मांडत होतो. एक बाब खरी आहे की, राज्याचे माननीय मुख्यमंत्री आपल्या सभागृहात आले. आमच्या विरोधी पक्षाचा रास्त हक्क आहे की, केंद्रसरकार कडून महाराष्ट्राला सापत्नपणाची वागणूक मिळत असताना अनेक वेळा केंद्रसरकारच्या मंत्र्यांकडून लोकसभेत आणि राज्यसभेत महाराष्ट्राच्या सरकारने वेळेवर केंद्रसरकारकडे प्रस्ताव न पाठविल्यामुळे महाराष्ट्राला मदत देता येत नाही अशा पध्दतीची उत्तरे त्या ठिकाणी दिली गेली आहेत. तो भाग वेगळा आहे.

सभापती महोदय, मी उभा यासाठी राहिलो आहे की, आज माननीय मुख्यमंत्री बोलत असताना तालिकेवर तालिका सभापती बसले होते. एक बाब नक्की आहे की, महाराष्ट्राच्या विधिमंडळामध्ये मुख्यमंत्री महोदय, बोलत असताना सभागृह कधी तहकूब झाले नाही. त्यावेळेस अनवधानाने तालिका सभापतींकडून सभागृहाचे कामकाज तहकूब करण्यात आले, त्याबद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो. या विषयावर पडदा टाकावा अशी मी आपल्याला विनंती करतो.

सभापती महोदय, आपण सभागृहाचे कामकाज सुरळीत चालावे यासाठी आपण नेहमी पुढाकार घेत असतात याबाबत कोणाचेही दुमत असणार नाही. काही सदस्यांनी खाली बसून शेरे केले त्यावर आपण संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. आपला तो हक्क आहे. परंतु त्याही पेक्षा वरिष्ठ मंत्री खाली बसून ज्यावेळेस शेरे मारतात ती बाब अत्यंत गंभीर आहे. मी त्याला निंदाजनक शब्द वापरत नाही. परंतु ती बाब सभागृहाच्या प्रथेला शोभेशी नाही. आपण आमच्या बाजूच्या सदस्यांना समज दिली त्याची आम्ही गांभीर्याने नोंद घेतो आहोत. परंतु तशाच पध्दतीने गांभीर्याची नोंद आपल्या मार्फत वरिष्ठ सभागृहाचे सदस्य राहिले आहेत आणि आज ते राज्य सरकारचे वरिष्ठ

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे......

नेते, वरिष्ठ मंत्री म्हणून कार्य करतात ते सुध्दा बसल्या जागेवरुन शेरे मारतात ती बाब योग्य आहे का एवढेच मला आपल्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे. राज्याचे मुख्यमंत्री बोलत असताना मघाशी सभागृह तहकूब झाले त्याबद्दल मी पुन्हा एकदा दिलगिरी व्यक्त करतो.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, माननीय सभापती महोदय, सर्व प्रथम मी आपल्याला सांगू इच्छितो की, मी लोकसभा, राज्यसभा, विधानसभा आणि विधान परिषदेचे कामकाज अनेक वेळा पाहिलेले आहे. सभापती हे निरपेक्ष असतात. जेव्हा सभापती महोदयांची निवड होते तेव्हा सभापती हे कोणत्याही पक्षाचे नसतात. म्हणून ज्या पध्दतीची वागणूक त्या स्थानावरुन सत्तारुढ पक्षातील सदस्यांना, मंत्र्यांना एवढेच नव्हे तर माननीय मुख्यमंत्र्यांना मिळते तेव्हा यासंदर्भात गांभीर्याने विचार व्हावयास पाहिजे असे मला वाटते. (अडथळा) तुम्ही काय करावयाचे ते तुम्ही ठरवा. परंतु आम्हाला माननीय उप सभापती महोदयांनी बोलण्याची परवानगी दिलेली असल्यामुळे मला बोलू द्यावे. (अडथळा)

F-1/....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. )

**उप सभापती :** मी संसदीय कार्य मंत्री महोदयांना बोलण्याची संधी दिलेली आहे...

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, मला येथे बोलू देत नाही हे बरोबर नाही.

**उप सभापती :** सभागृहात जे वातावरण निर्माण होत आहे ते कामकाजाला पोषक नाही. यापुढे गोंधळ झाला तर मी सरळ सभागृह तहकूब करीन. मी आता सन्माननीय कामकाज मंत्र्यांना बोलण्याची संधी दिलेली आहे. त्यांच्यानंतर आपण बोलावे.

श्री.गिरीष् बापट : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी निवेदन केले. आपण त्यांना बोलण्यासाठी पहिली संधी दिली आणि त्यानंतर अनेकांना संधी न देता मला संधी दिली, त्याबद्दल मी आपणास प्रथम धन्यवाद देतो.

सभापती महोदय, राज्याचे जे प्रमुख असतात ज्यांना आपण नेते म्हणतो ते विधासभा आणि विधानपरिषद सभागृहाचे नेते असतात. अनेकवेळा विषयावंरुन विरोधकांची आग्रही भूमिका असते, ते घोषणा देतात, सभात्याग करतात, परंतु जेव्हापासून विधानसभा आणि विधानपरिषद बांधले तेव्हापासून माननीय मुख्यमंत्री आपले म्हणणे मांडण्याकरिता उभे आहेत आणि सभागृहाचे कामकाज तहकूब करण्यात आले अशी इतिहासात कधीही नोंद झालेली नाही. विरोधकांना घोषणा द्यायच्या आहेत, त्यांचे म्हणणे मांडावयाचे आहे, त्यांना वेलमध्ये यायचे आहे, त्याबद्दल मला काही आक्षेप नाही त्यांच्या तीव्र भावना त्यांनी मांडाव्यात. सभापतीस्थानी असलेले तालिका सभापती हे नवीन आहेत, पण माननीय मुख्यमंत्र्यांचे भाषण सुरु असताना सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या जागेवर बसणे आवश्यक होते. पण माननीय मुख्यमंत्र्यांचे भाषण सुरु असताना सभागृह तहकूब करण्याकरिता काही सन्माननीय सदस्य प्रोत्साहित करीत होते, हे आपण कॅमेऱ्यावर पहावे. जर अशाप्रकारे कोणी प्रोत्साहित करीत असतील तर त्यांच्यावर देखील कारवाई झाली पाहिजे असे मला वाटते. आपण सभागृहात नवीन प्रथा परंपरा मांडणार असाल, माननीय मुख्यमंत्र्यांचा अपमान करणार असाल ते योग्य नाही. केवळ आपले बहुमत आहे म्हणून हे राज्य कधीही ते सहन करणार नाही, हे मी येथे नम्रपणे सांगतो. आपली ताकद किती आहे हे प्रत्येकाला माहीत आहे. आपले आमदार किती आहेत ते माहीत आहे. आपण नियमाप्रमाणे कामकाज चालवितो. पण या खुर्चीवरुन

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गिरीष बापट.....

आम्हाला न्याय मिळत नसेल तर भविष्य काळामध्ये काय करावे लागेल याचा देखील आम्हाला विचार करावा लागेल, हे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. (अडथळा ) मी काय येथे बांबू घेऊन आलो आहे काय ? माझे भाषण सुरु आहे. मी काय बोलतो ते आपण पूर्णपणे ऐकून घ्यावे. आम्हाला या व्यासपीठावरुन न्याय मिळत नसेल तर आम्ही अविश्वासाचा ठराव आणायला मागेपुढे पाहणार नाही, एवढेच मी या निमित्ताने आपणास सांगतो आणि माझे बोलणे पूर्ण करतो.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांनी आपले मत व्यक्त केले. जो प्रकार घडला त्यावेळी सभापतीस्थानी तालिका सभापती होते. सभागृहामध्ये लोकशाही पद्धत्तीने वेलमध्ये येऊन गोंधळ घालण्याची 15 वर्षापासून जी प्रथा परंपरा आपण लावली होती, तीच प्रथा परंपरा या वेलमध्ये चालू होती. अनावधनाने एक गोष्ट घडली की, माननीय मुख्यमंत्री बोलत असताना सभागृह तहकूब झाले आणि आमच्याही मनामध्ये वेदना झाल्या. त्याबद्दल सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी दिलगिरी व्यक्त केलेली आहे.

सभापती महोदय, सभागृहाने कामकाजाकडे वाटचाल सुरु करावी हीच आमची भूमिका होती. पण माननीय संसदीय कामकाज मंत्री बोलले की, जर आम्हाला न्याय मिळत नसेल तर पुढे आम्हाला विचार करावा लागेल. मग खालच्या सभागृहातील सन्माननीय सदस्यांनी सुद्धा अशाच पद्धतीने चेअरकडे पाहून बोलायचे काय ? संसदीय कामकाज मंत्र्यांची सर्वात मोठी भूमिका ही सत्ताधारी आणि विरोधक या दोघांमध्ये समन्वय साधून, दोघांमध्ये सामंजस्य निर्माण करुन सभागृहाचे कामकाज पार पाडणे. माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांनी सांगितले की, माननीय मुख्यमंत्री बोलत असताना गोंधळ करु नये. मी एक अर्थसंकल्पीय अधिवेश्न पाहिले आहे की, त्यावेळी माननीय वित्त मंत्र्यांना अर्थसंकल्पीय भाषणात अडथळा निर्माण करण्यात आला होता. त्यावेळी ते विरोधी पक्षात होते. खालच्या सभागृहात माननीय वित्त मंत्री अर्थसंकल्प मांडत होते त्यावेळी त्यांना अर्थसंकल्पांच्या अ शब्दपासून अर्थसंकल्पाच्या जय हिंद, जय महाराष्ट्र पर्यंत व्यवस्थितपणे अर्थसंकल्प मांडू दिला नाही. जे झाले त्या गोष्टीचे आम्ही समर्थन करीत नाही. माननीय मुख्यमंत्र्यांचे भाषण सुरु असताना सभागृह तहकूब झाले त्याबद्दल आम्ही दिलगिरी व्यक्त

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे....

केलेली आहे. आम्ही शेतकऱ्यांच्या बाजूने भूमिका मांडावयाची नाही काय ? समोरच्या बाकावरील सदस्यांना वाटते की, या गोष्टीचा अपमान झाला आहे. परंतु दिनांक 21 डिसेंबर रोजी चार राज्यांना पैसे मिळत असतील आणि दुष्काळात होरपळत असणाऱ्या महाराष्ट्राला पैसे मिळत नसतील तर तो महाराष्ट्राचा अपमान नाही काय, हा कोणाचा अपमान आहे, त्या बाबतीत आम्ही सदनामध्ये बोलायचे नाही काय, आम्हाला हे बोलण्याची गरज का पडली ? आपली जर हिम्मत होती, किंमत होती आणि केंद्र सरकारमध्ये इज्जत होती तर आपणास पैसे मिळाले असते. ओरिसा, पश्चिम बंगाल, मणिपूर या राज्यांसोबत आपल्या राज्याला देखील मदत मिळाली असती. आम्ही लोकशाही पद्धतीने आमची भूमिका मांडत असताना काही चुकीच्या गोष्टी झाल्या असतील आणि त्याबद्दल दिलगिरी व्यक्त केल्यानंतर सुद्धा माननीय संसदीय कार्य मंत्र्यांनी अशापद्धतीने विनंती वजा धमकी किंवा धमकी वजा विनंती जे काही समजाचे ते समजा, ती केली. या सार्वभौम सभागृहाच्या सभापतींच्या आसनाकडे पाहून अशाप्रकारची धमकी देणे ही सुद्धा शोभणारी गोष्ट नाही. असा प्रकार देखील सभागृहात कधी झाला नाही. आपण जी गोष्ट सांगितली त्याबद्दल दिलगिरी व्यक्त केलेली आहे. हे सभागृह झाल्यापासून कोणतेही संसदीय कामकाज मंत्री कोणाला बोलले नसतील....

श्री.गिरीष बापट : आपण बोलण्याची वेळ आणली...

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, जे झाले त्याबद्दल दिलगिरी व्यक्त केल्यानंतर मोठ्या मनाने माफ करावयास पाहिजे होत. परंतु माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांनी त्या खुर्चीचा अपमान करायचा, सन्माननीय सभापतींचा अपमान करायचा हे शोभणारे आहे काय ? सत्ताधारी आणि विरोधी पक्षामध्ये काही संघर्ष होत असेल तर माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांना सामजस्यांची भूमिका घ्यावी लागते. परंतु माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांची भूमिका अशी राहिली तर हे सदन कसे चालले ? आम्ही आमच्यासाठी काही मागत नाही. जे शेतकऱ्यांना हक्काचे मिळायचे होते, या महाराष्ट्राला हक्काचे मिळायचे होते ते मिळाले नाही म्हणून आमची ओरड आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय,...

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांना सांगू इच्छितो की, आपल्याला बोलण्याची संधी देण्यासाठीच मी उभा राहिलो आहे. परंतु त्यापूर्वी आपण माझे म्हणणे ऐकून घ्यावे. सभागृहातील एकंदरीत जे वातावरण पाहत आहे ते योग्य आहे असे मला वाटत नाही. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मला जे काही सांगायचे आहे ते दालनात नव्हे तर लोकांसमोर मांडणार आहे. या संदर्भात जे काही आहे ते स्पष्ट झाले पाहिजे.क

(विरोधी व सत्ताधारी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

सभागृहाचे कामकाज व्यवस्थित आणि सुरळीतपणे सुरु करण्याचा माझा प्रयत्न आहे. सभागृहाचे कामकाज खरोखरच सुरळीतपणे सुरु ठेवण्यासाठी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी मी काय बोलतो ते शांतपणे ऐकले पाहिजे. आपण जोरात बोलल्यानंतरच ते मला ऐकू येईल असे नाही. माझा आवाज देखील तुमच्याइतकाच भक्कम आहे. मी यापेक्षाही जास्त जोरात बोलू शकतो. त्यामुळे मी जे काही बोलतो ते दोन मिनिटे तरी ऐकून घ्यावे. एकाच वेळी सर्वच सन्माननीय सदस्य बोलल्यास मला ऐकू येत नाही आणि मी काय बोलतो हे तुम्हाला सुध्दा ऐकू येत नाही. आता सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी दोन मिनिटात आपली भूमिका मांडावी. त्यानंतर मला माझ्या भावना सभागृहासमोर मांडायच्या आहेत.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सभागृहाचे सकाळचे कामकाज स्थगित करावे लागले. माननीय मुख्यमंत्री बोलत असतानाच सभागृहाचे कामकाज स्थगित करावे, अशा प्रकारची भूमिका विरोधी पक्षाची नव्हती. त्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी मोठ्या मनाने सभागृहात दिलगिरी व्यक्त केली आहे. आम्ही नेहमीच माननीय सभापती, माननीय मुख्यमंत्री, माननीय संसदीय कार्य मंत्र्यांचा सन्मान करीत आलो आहोत. त्यांचे म्हणणे ऐकून घेण्याची आमची सातत्याने भूमिका राहिली आहे. या अधिवेशनात सुध्दा सुरुवातीच्या काळापासून दोन-तीन वेळा माननीय मुख्यमंत्र्यांचे या सभागृहात भाषण झाले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

माननीय मंत्री वा माननीय मुख्यमंत्र्यांकडून आम्हाला उत्तराची अपेक्षा होती. महोदय, अशा प्रकारच्या भावना केवळ विदर्भातील जनतेमध्येच आहेत असे नाही तर मराठवाडा, खानदेश आणि संपूर्ण राज्यातील जनतेच्या त्याच भावना आहेत. शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याच्या मागणीवरुन सभागृहाचे पहिल्या आठवड्याचे कामकाज होऊ शकले नाही. दुसऱ्या आठवड्यात सुध्दा सभागृहाचे कामकाज कर्जमाफीच्या मागणी भोवतीच फिरत राहिले. परंतु आज अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी सन्माननीय सदस्यांच्या भावनांचा उद्रेक झाला. केंद्र सरकारने महाराष्ट्र राज्य वगळता इतर राज्यांना मदत जाहीर केली. परंतु महाराष्ट्रासाठी कसल्याही प्रकारची मदत जाहीर केली नाही. त्यामुळे आम्हा सन्माननीय सदस्यांच्या भावना अनावर झाल्या.

सभापती महोदय, सकाळी सभागृहाचे कामकाज सुरु होत असताना माननीय मुख्यमंत्री सभागृहात आले. त्यावेळी आम्ही त्यांच्याकडून शेतकऱ्यांना मदत करण्याची अपेक्षा बाळगणे स्वाभाविक आहे. आम्हाला वाटले होते की, या राज्यातील जनतेच्या संदर्भात, शेतकऱ्यांच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री निवेदन करतील की, आम्ही या राज्यातील शेतकऱ्यांचे कर्ज माफ करीत आहोत. परंतु नंतर आमच्या लक्षात आले की, त्यांची अशा प्रकारची कोणतीही भावना नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी या विषयाच्या बाबतीत कोणतेही वक्तव्य केले नाही. आम्ही त्यांचे भाष्य ऐकत होतो. आम्हाला सर्व कळत होते. परंतु ज्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफी बाबत कोणतेही भाष्य केले नाही त्यावेळी सन्माननीय सदस्यांच्या भावना बाहेर येणे स्वाभाविक होते. या सभागृहाच्या इतर कामकाजापेक्षा आम्हाला विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा विषय महत्त्वाचा वाटतो. परंतु या ठिकाणी त्यावर केवळ चर्चा करीत राहणे योग्य नाही. विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत असताना त्यांना कर्जमाफी देणे अपेक्षित आहे.

सभापती महोदय, आम्ही सत्ताधारी पक्षाला नेहमी कामकाजासाठी सहकार्य करीत आलो आहोत. सन्माननीय सदस्यांच्या भावनांचा उद्रेक झाल्यामुळे अशा प्रकारची घटना घडली. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांच्याकडून दिलगिरी व्यक्त करण्यात आली आहे. सन्माननीय सदस्यांच्या भावना गांभीर्याने घेऊन सकारात्मकरित्या उत्तर देऊ, राज्यातील शेतकऱ्यांना मदत करु किंबहुना ती आमची भूमिका राहणार आहे, केंद्र शासन आपल्या राज्याला

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

आजच्या आज मदत देणार आहे असे राज्य सरकारच्या माध्यमातून सांगण्याची आवश्यकता होती. सभागृहाचे कामकाज सुरु ठेवले पाहिजे, आमचे अधिकार काय आहेत, आम्ही मुख्यमंत्री किंवा संसदीय कामकाज मंत्री आहोत म्हणून, आम्ही म्हणू तशाप्रकारे सभागृहाचे कामकाज चालले पाहिजे, हे आम्ही खपवून घेणार नाही. खरे म्हणजे या विषयी दिलगिरी सुध्दा व्यक्त करण्याची गरज नव्हती. कारण हा शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. शेतकऱ्यांचा प्रश्न सोडविण्यासाठी आम्हाला कोणत्याही स्तरावर जावे लागले तरी आम्ही तेथपर्यंत जाऊ. या ठिकाणी आम्ही केवळ भाषणे ऐकून घेण्यासाठी बसलेलो नाही. त्यामुळे...

(सत्ताधारी पक्षातील काही सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलतात.)

**उप सभापती** : मला वाटते सभागृहात ज्या पध्दतीने कामकाज सुरु आहे ते वातावरण सभागृहाचे कामकाज चालविण्यासाठी अजिबात पोषक नाही.

माननीय विरोधी पक्ष नेते, सभागृहाचे नेते आणि पक्षाच्या तीन-तीन महत्त्वाच्या मंडळींनी माझ्या दालनात त्वरित यावे. आपल्याशी चर्चा केल्यानंतर मी ठरवेन की, सभागृहाचे कामकाज पुढे सुरु ठेवायचे की नाही. कारण अशा वातावरणात कामकाज चालविणे मला अशक्य आहे. त्यामुळे मी सभागृहाचे कामकाज अर्धा-तास तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 11.43 ते 12.13 पर्यंत स्थगित झाली.)

-------

..एच..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**<u>नियम 289 च्या प्रस्तावाच्या सुचनेसंबंधी</u>**

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, मी विरोधी पक्षाच्या सर्व सन्माननीय सदस्यांच्या वतीने नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना दिली आहे. दिनांक 21 डिसेंबरला एनडीआरएफची बैठक झाली, त्या बैठकीमध्ये महाराष्ट्राला एक छदाम देखील मिळाला नाही. आज शेतकऱ्यांची परिस्थिती गंभीर असताना, 10 हजार कोटी रूपयांचे शासनाने पॅकेज जाहीर केलेले असताना, राज्य शासनाला एनडीआरएफकडून कोणत्ीही मदत मिळत नाही, हा राज्याचा केंद्र शासनाकडून फार मोठा अपमान झालेला आहे. सबंधित विषयाच्या बाबतीत आम्ही नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिली आहे. माझी विनंती आहे की, संबंधित विषयावर चर्चा करावी नाही तर सरकारने भूमिका स्पष्ट करावी. राज्यातील सबंध शेतकऱ्यांचा, दुष्काळी भागातील सबंध लोकांचा अशा पध्दतीचा अपमान होत असेल तर हे किती दिवस सहन करायचे ? (अडथळा) मागचे हिवाळी अधिवेशन झाले, आताचे हिवाळी अधिवेशन होत आहे.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

सभापती महोदय, शासनाने शेतकऱ्यांचे मागच्या पॅकेजचे 1 हजार कोटी रूपये अजून दिले नाहीत. 10 हजार कोटी रूपयांच्या नवीन पॅकेजची घोषणा केली. थेट मदत 10 हजार कोटी रूपये हे काहीही नाही. राज्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांची वाईट अवस्था झाली आहे. गुजरात सरकारने गुजरातमध्ये कापसाला साडे पाचशे रूपये बोनस जाहीर केला आहे. राज्यातील शेतकरी एक किलो कापूस झाला तरी सुध्दा विकायला तयार नाही. मग त्याने आता गुजरातला कसे जायचे ? गंभीर परिस्थिती आहे. मग आता काय चर्चा करावी ? ओरडून, ओरडून सभागृहाचे पहिले 5 दिवस गेले. शेतकऱ्यांच्या व्यथा मांडल्यावर सरकारला पाझर फुटेल .... (अडथळा) सभापती महोदय, आपल्याला शेतकऱ्यांच्या भावना जर समजल्या तर त्यांना समजेल की, मी शेतकऱ्यांवर बोलत आहे. आपण .... (अडथळा)

....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, ....

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीतच असतात.)

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, आपण मला बोलण्यास परवानगी दिली आहे. आपण म्हणत असाल तर मी खाली बसतो. राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आर्थिक मदतीची मागणी 6 हजार कोटी रूपयांची केली असताना केंद्र शासनाने केवळ 2 हजार कोटी रूपयांची मदत केली आहे.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीतच असतात.)

**उप सभापती** : अशा परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 20 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.15 ते 12.35 पर्यंत स्थगित झाली.)

----

....।

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती ॲड.हुस्नबानु खलिफे)**

**तालिका सभापती :** सभागृहाची बैठक मी पुन्हा 20 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.35 ते 12.55 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-----------

...J-1.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती ॲड.हुस्नबानू खलिफे )**

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक मी पुन्हा 2.00 वाजेपर्यंत स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 12.55 ते 2.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-------

..K-1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती )**

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकत्र बोलण्याचा प्रयत्न करतात)

**सभापती :** सर्व सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे, मी उभा आहे, आपण सर्वांनी खाली बसावे, चुकीचे पायंडे पाडू नका. मी उभा राहिल्यानंतर आपणाला खाली बसावे लागते हे आपणाला सांगायची गरज आहे काय ? नाही तर मला लेखी निदेश काढावे लागतील, कृपया नवीन पायंडा पाडू नका. विषय असा आहे की, दोन्ही सभागृहाचे कामकाज तीन आठवडे चालू आहे, आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. आपण कटुता निर्माण करु नका, विदर्भातील अधिवेशनासाठी आपण येथे आलो आहोत. वरिष्ठ सभागृहात काही गैर होऊ नये. प्रथा व परंपरा सोडून काही होऊ नये. सभागृहाच्या व आपल्या प्रतिष्ठेला बाधा होईल असे काही करु नये. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील एका प्रश्नावर ऑनलेग होते, अशी माझी माहिती आहे. त्यांनी आपले म्हणणे मांडावे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, यासंदर्भात मला आपल्या माध्यमातून सभागृहाला सांगायचे आहे. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांना मला सांगावयाचे आहे की, आपण एवढे विचलित का आहात, माननीय मुख्यमंत्री महोदयांना या ठिकाणी बोलता आले नाही, त्याबाबत येथे दिलगिरी व्यक्त केली, येथपर्यंत हा विषय थांबला होता, तो विषय संपला होता. तरी देखील सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी लगेच म्हटले की, दिलगिरी व्यक्त करण्याची आवश्यकता नाही. हे शब्द त्यांनी मागे घेतले पाहिजे, असे बरोबर नाही.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकत्र बोलण्याचा प्रयत्न करतात)

**सभापती :** मंत्री महोदयांनी दालनातील विषय येथे काढू नये. आपण सर्वांनी शांत बसा त्यामधून मी मार्ग काढतो. कृपया सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे आपण खाली बसा, हा विषय वाढवू नका. हा विषय वाढू नये म्हणून मी बोलत होतो. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांच्या बोलण्यात काही असेल तर मी ते तपासून घेतो. आता हा विषय संपला आहे, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी आपले म्हणणे मांडावे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

...2..

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मला बोलण्याची संधी द्यावी. मंत्री महोदयांनी माझे नाव घेतले आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे आपण कृपया खाली बसा. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांना मी बोलण्यास संधी दिली आहे, याबाबत मी नंतर बघतो. यासंदर्भात मी निर्णय दिलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त आपण देखील खाली बसा, मी आपणाला नंतर संधी देईन.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, अधिवेशनाच्या पहिल्या आठवड्यात शेतकऱ्यांची कर्जमाफी करा, अशी आम्ही मागणी केली होती. त्यानंतर पहिल्या आठवड्यात कामकाज बंद झ ाले होते. कामकाजाला सुरुवात करताना एक आठवडा गेला. दिनांक 21/12/2015 रोजी केंद्र सरकारच्या उच्चस्तरीय राष्ट्रीय निवारण फंडातून महाराष्ट्राला मदत मिळावी. यासाठी राज्यातील सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींचे शिष्टमंडळ माननीय पंतप्रधान यांच्या भेटीला घेऊन जावे अशी आमची मागणी होती. 21 तारखेला बैठक झाली केंद्र सरकारकडून महाराष्ट्रातील दुष्काळासाठी कोणतीही मदत मिळालेली नाही. म्हणून सर्वपक्षीय शिष्टमंडळ आपण घेऊन जावे. ही गोष्ट सरकारने ऐकली नाही. यामध्ये एक आठवड्याचा कालावधी गेला. 21 तारखेला ही बैठक झाली. बैठक झाल्यावर विरोधी पक्ष नेत्यांनी त्यासंदर्भातील प्रोसिडिंग व निर्णय मागवून घेतले, त्यामध्ये छत्तीसगडसाठी 925 कोटी रुपये, पश्चिम बंगालसाठी 1104 कोटी रुपये, मणिपूरसाठी 34 कोटी रुपये, ओरिसासाठी 380 कोटी रुपयांची मदत देण्यात आली आहे. देशातील सर्वात जास्त दुष्काळ महाराष्ट्रात आहे, महाराष्ट्रात जास्त शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत, म्हणून केंद्र सरकारची मदत मिळाली पाहिजे. याबाबत शासनाने काय कार्यवाही केली. केंद्र सरकार जाणूनबुजून महाराष्ट्राची अवहेलना करते, महाराष्ट्राला मदत देत नाही. म्हणून आम्ही कालपासून मागणी करीत आहोत की, केंद्र सरकारची मदत मिळण्यासाठी राज्य शासनाने ठोस भूमिका घेतली पाहिजे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील हा विषय आपण संपवावा.

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात)

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, या अगोदर केंद्र शासनाकडून आपणाला 920 कोटी रुपयांची मदत प्राप्त झालेली आहे. विरोधी पक्षाच्या सदस्यांनी माझे म्हणणे ऐकून घेतले पाहिजे, आपण राजकारण करु नका. राज्य सरकारला 920 कोटी रुपये अगोदर दिले आहेत. 4000 कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात मंजूर करण्यात आली आहे. केंद्र शासनाने काल किंवा परवा मदत दिली काय त्यामुळे काही फरक पडत नाही. केंद्र शासनाकडील निधी राज्य शासनाकडे आलेला आहे. विरोधी पक्षाला नुसते राजकारण करायचे आहे. महाराष्ट्राच्या इतिहासात कधीही इतकी जास्त मदत मिळालेली नाही. आता केंद्र सरकारने भरपूर मदत केलेली आहे. आपल्या सरकारच्या कालखंडात तुकडे फेकल्यासारखे 200 कोटी, 400 कोटी रुपये मिळत होते. आता केंद्र शासनाने राज्य सरकारला निधी दिलेला आहे. 15 दिवस अगोदर आणेवारी कमी करण्यात आली आहे. 9 नोव्हेंबरला प्रस्ताव पाठविण्यात आला होता. त्यानंतर तातडीने केंद्र सरकारची टीम महाराष्ट्रात आली होती. या राज्यात कोणतीही आर्थिक अडचण नाही. 4000 कोटी रुपये या अधिवेशनात मंजूर करण्यात आले आहेत, केंद्र शासनाचे 920 कोटी रुपये आले आहेत, आणखी पैसे येतील. आज आपणाला निधीची आवश्यकता नाही. केंद्र सरकारने आधीच पैसा दिलेला आहे. विरोधी पक्ष पुन्हा पुन्हा राजकारण करीत आहे, राजकारण करण्यासाठी दिवस वाया घालविण्याचा यांचा हेतू साध्य होणार नाही. याबाबत राज्य शासन गंभीर आहे, पैसा आलेला आहे, केंद्राने भरीव मदत केलेली आहे. या देशात कोणत्याही राज्याला जेवढी मदत मिळाली नाही त्यापेक्षा जास्त मदत महाराष्ट्र शासनाला केली आहे. ही मदत प्रत्यक्षात शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यात येत आहे. राज्यात आज दुष्काळासाठी पैशाची अडचण नाही. परिपूर्ण तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. विरोधी पक्षाला विचारुन केंद्र सरकार मदत करणार नाही. तत्कालीन सरकारमध्ये मदत मिळविण्यासाठी खुशामत करावी लागत होती, दहा वेळा जाऊन देखील पैसे मिळत नव्हते. केंद्र सरकारकडून पहिल्यांदा राज्यात टीम येण्याआधी ॲडव्हांस निधी मिळालेला आहे. यासंदर्भातील प्रस्ताव उशिरा गेलेला नाही, प्रस्ताव आधीच गेलेला आहे. जे आरोप करण्यात येत आहेत ते चुकीचे आहेत. राजकीय हेतूने हे सर्व चालले आहे. यांना शेतकऱ्यांशी काही

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात)

श्री.एकनाथराव खडसे....

देणेघेणे नाही, त्यांच्या व्यथांशी काही देणेघेणे नाही. निव्वळ या ठिकाणी राजकारण करण्यात येत आहे. केंद्र सरकारने भरपूर निधी दिलेला आहे, ही वस्तुस्थिती आहे.

**सभापती** : हा विषय आता संपला आहे, मी पुढील कामकाज घेत आहे.

-------

....5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात)

**पृ.शी.:** लेखी उत्तरे.

**मु.शी.:** तारांकित प्रश्नाची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

डॉ.रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजनेअंतर्गत महानगरपालिकेतील सफाई कामगारांना सदनिका देण्याबाबत या विषयावरील श्री.सुभाष चव्हाण, माजी वि.प.स. व इतर वि.प.स.यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक 34672 ला दिनांक 19 डिसेंबर, 2012 रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे अधिक माहिती छापावी.)

----

....6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात)

**पृ.शी./मु.शी.:** कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

डॉ.रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लोकलेखा समितीच्या सन 2001-2002 या वर्षाच्या आठव्या अहवालातील परिच्छेद क्र.1.28 मध्ये समितीने केलेल्या शिफारशींनुसार मंत्रालयीन सर्व विभागांनी सन 2014-2015 या वित्तीय वर्षात केलेल्या पुनर्विनियोजनाबाबतच्या माहितीचे एकत्रित विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : विवरणपत्र सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

-----

श्री.गिरीश बापट ( संसदीय कार्य मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम, 2005 च्या कलम 6 (1) नुसार सन 2015-2016 च्या अर्थसंकल्पाच्या संदर्भात जमा व खर्चाच्या अर्धवार्षिक आढाव्याचे निष्कर्ष दर्शविणारे विवरापत्र सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : विवरणपत्र सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

-----

....L-1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात)

श्री.प्रवीण पोटे-पाटील (खनिकर्म राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादित, नागपूर यांचा सन 2013-2014 या वर्षाचा चाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मॉयल लिमिटेड यांचा सन 2014-2015 या वर्षाचा त्रेपन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात)

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित, औरंगाबाद यांचा सन 2013-2014 या वर्षाचा सत्तेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

श्री.एकनाथ शिंदे (सार्वजनिक बांधकाम {सार्वजनिक उपक्रम} मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यांचा सन 2007-2008, 2008-2009, 2009-2010, 2010-2011 व 2011-2012 या वर्षाचे अनुक्रमे बारावा, तेरावा, चौदावा, पंधरावा व सोळावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात)

**पृ.शी.:** पांढुर्णा (जि.वर्धा) व रायगड येथील शासकीय आश्रमशाळेसह राज्यातील व वसतीगृहातील मुलींवर झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणाची सखोल चौकशी करुन अहवाल सादर करण्यासाठी संयुक्त तदर्थ समिती गठीत करणे

**मु.शी.:** पांढुर्णा (जि.वर्धा) व रायगड येथील शासकीय आश्रमशाळेसह राज्यातील व वसतीगृहातील मुलींवर झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणाची सखोल चौकशी करुन अहवाल सादर करण्यासाठी संयुक्त तदर्थ समिती गठीत करण्याबाबत आदिवासी विकास मंत्र्यांचा प्रस्ताव

श्री.विष्णू सवरा : (आदिवासी विकास मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पांढुर्णा (जि.वर्धा) व रायगड येथील शासकीय आश्रमशाळेसह राज्यातील व वसतीगृहातील मुलींवर झालेल्या लैंगिक अत्याचाराबाबत" या विषयावरील विधानपरिषद सभागृहात दिनांक 15 डिसेंबर, 2015 रोजी उत्तरित झालेल्या ता.प्र.क्र.11958 च्या प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार दोन्ही सभागृहाच्या 13 महिला सदस्यांची चौकशी समिती नियुक्त करावी, असा प्रस्ताव मांडतो.

या चौकशी समितीमध्ये 13 महिला सदस्यांपैकी 9 महिला सदस्या विधानसभेच्या व 4 महिला सदस्या विधानपरिषदेच्या असतील.

विधानसभेच्या खालील 9 महिला सदस्या या समितीवर राहतील.

1) श्रीमती विद्या ठाकूर, माननीय महिला व बालविकास राज्यमंत्री
2) श्रीमती अमिता चव्हाण, वि.स.स.
3) श्रीमती निर्मला गावीत, वि.स.स.
4) श्रीमती सीमा हिरे, वि.स.स.
5) श्रीमती दिपिका चव्हाण, वि.स.स.
6) श्रीमती संगिता ठोंबरे, वि.स.स.
7) श्रीमती तृप्ती सावंत, वि.स.स.
8) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स.
9) श्रीमती सुमनताई पाटील, वि.स.स.

..3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विष्णू सवरा.....

1) श्रीमती नीलम गोऱ्हे, वि.प.स.

2) श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स.

3) श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स.

4) श्रीमती दिप्ती चवधरी, वि.प.स.

श्रीमती विद्या ठाकूर, माननीय महिला बालविकास राज्यमंत्री ह्या समितीच्या समिती प्रमुख राहतील.

-----

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात)

**पृ.शी.:** लेखी उत्तरे.

**मु.शी.:** अतारांकित प्रश्नोत्तरांची सहावी यादी सभागृहासमोर ठेवणे.

सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तरांची सहावी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : अतारांकित प्रश्नोत्तरांची सहावी यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात)

<u>सभागृहाच्या कामकाजासंबंधी</u>

**सभापती** : आजच्या कार्यक्रम पत्रिकेवर दर्शविलेल्या नियम 93 अन्वयेच्या सूचनांची निवेदने आज घेण्यात येणार नाहीत, ही निवेदने पटलावर ठेवण्यात यावीत. लक्षवेधी सूचनांवरील निवेदने पटलावर ठेवण्यात यावीत. शासकीय विधेयके व अंतिम आठवडा प्रस्ताव आज होणार नाही.

या अधिवेशनात ज्या लक्षवेधी सूचना दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात आल्या होत्या, परंतु काही कारणास्तव त्या चर्चेत येऊ शकल्या नाहीत, अशा सर्व लक्षवेधी सूचना संदर्भात माननीय सदस्यांनी मागणी केल्यास व मला उचित वाटल्यास त्या संबंधी मी माझ्या दालनात बैठक आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात)

-----

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देत असतात)

**पृ.शी.** : राज्यात जीवनावश्यक वस्तूंची होत असलेली प्रचंड भाववाढ तसेच तत्संदर्भात होत असलेला गैरव्यवहार

**मु.शी.** : राज्यात जीवनावश्यक वस्तूंची होत असलेली प्रचंड भाववाढ तसेच तत्संदर्भात होत असलेला गैरव्यवहार या विषयावर सर्वश्री. शरद रणपिसे, धनंजय मुंडे, माणिकराव ठाकरे, हेमंत टकले, संजय दत्त, अमरसिंह पंडित, हरिसिंग राठोड, सतिश चव्हाण, राजेंद्र मुळक, जयंत पाटील, मुझफ्फर हुसेन, आनंदराव पाटील, ॲड. रामहरी रुपनवर, प्रा. जोगेंद्र कवाडे, श्रीमती दिप्ती चवधरी, सर्वश्री. सुभाष झांबड, किरण पावसकर, प्रकाश गजभिये, संदिप बाजोरिया, श्रीमती विद्या चव्हाण, श्री. अनंत गाडगीळ, श्रीमती हुस्नबानू खलिफे, प्रा. जनार्दन चांदूरकर, सर्वश्री. चंद्रकांत रघुवंशी, अमरनाथ राजूरकर, डॉ. सुधीर तांबे, श्री. भाई जगताप, वि.प.स. यांचा प्रस्ताव

(प्रस्ताव पुनः प्रस्तुत झाला......

**सभापती** : नियम 260 च्या प्रस्तावावर माननीय सदस्य बोलणार नाहीत. मंत्री महोदयांनी उत्तराचे भाषण सुरु करावे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी शेती महामंडळाबाबत सभागृहात काही मुद्दे उपस्थित केले. शेती महामंडळाकडे जवळपास 45 हजार एकर जमीन शिल्लक आहे. ही जमीन मोठया गटांमध्ये विभागली आहे. या जमिनीचे लहान लहान गट करणे प्रशासकीय दृष्टया शक्य नाही.

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देत असतात)

**सभापती :** सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन मी नवीन पायंडा पाडतो. मंत्री महोदयांना उत्तर देण्याची संधी देणे क्रमप्राप्त आहे. परंतु एकंदरीत भावना लक्षात घेऊन मी मंत्री महोदयांना सूचना देतो की, आपली उत्तराची भाषणे लेखी स्वरुपात आणून पटलावर ठेवण्यात यावीत. आता हे अधिवेशन संस्थगित होत नाही. पुढील अधिवेशन दिनांक 9 मार्च, 2016 रोजी भरविण्यात येईल.

-------

..एम.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**सभापती :** मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 2.24 ते 2.34 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

N-1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, कर्ज माफीच्या संदर्भात ...

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय,.....

**सभापती :** सभागृहाला माझी विनंती आहे की, आता राष्ट्रगीताचा विषय काढू नका. ठीक आहे. मंत्री महोदयांच्या भावना लक्षात घेऊन मी सभागृह नेत्यांना दोन मिनिटे बोलण्याची परवानगी देतो.

श्री. गिरीष बापट : सभापती महोदय, माननीय महसूल मंत्र्यांचे उत्तराचे भाषण सुरुच होते. तसेच, या प्रस्तावाशी संबंधित असलेल्या मंत्री महोदयांना उत्तर देण्याची संधी दिली पाहिजे.

**सभापती :** आता हा विषय संपलेला आहे. मी या प्रश्नावर सोल्यूशन काढून दिलेले आहे. आता सन्माननीय सभागृहाच्या नेत्यांनी आपले विचार मांडण्यास सुरुवात करावी.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सभागृहाच्या इतिहासामध्ये, हे सभागृह स्थापन झाल्यापासून पहिल्यांदा हे असे घडते आहे, हे योग्य नाही. ठीक आहे, जे घडले ते घडले त्याबाबत मी बोलत नाही.

सभापती महोदय, या सभागृहात माननीय मुख्यमंत्री उत्तर देत असताना सभागृहाचे कामकाज बंद करणे, सभागृहाच्या नेत्यांचे भाषण सुरु असताना सभागृहाचे कामकाज बंद करणे हे कितपत उचित आहे. तुमचे या सभागृहात बहुमत आहे म्हणून असे करणे अत्यंत अयोग्य आहे.

सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात विचार मांडण्याची आपण मला परवानगी दिली होती. या ठिकाणी पाच मंत्री महोदयांवर आरोप करण्यात आल्यामुळे त्या मंत्री महोदयांकडून खुलासा यावयास पाहिजे होता. संबंधित मंत्र्यांचा खुलासा न येता सभागृहाचे कामकाज स्थगित झाले. आता 9 मार्च रोजी सभागृहाची बैठक होईल अशी घोषणा करणे (अडथळा) माझ्याकडे यासंदर्भात रेकॉर्ड आहे.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**सभापती :** माननीय खडसे साहेब आपला जो विषय खंडित झाला होता त्या विषयावर आपण बोलावे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मी त्या रेकॉर्डची कॉपी एका मिनिटात काढली होती. आपण काय बोलला आहात त्यासंदर्भात माझ्याकडे रेकॉर्ड आहे. (अडथळा)

सभापती महोदय, या ठिकाणी शेती महामंडळाच्या कोटयवधी रुपयांच्या गैरव्यवहाराच्या बाबत मी आता खोलवर जात नाही. मी दोन मिनिटात सांगतो की, शेती महामंडळ गेल्या अनेक वर्षापासून तोटयामध्ये होते. शेती करण्यासाठी सुध्दा मागच्या कालखंडामध्ये सातत्याने दर वर्षी कर्ज काढून शेती महामंडळाची शेती केली जात असे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हे अधिवेशन तीन आठवडे चालले आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी त्यांच्या पध्दतीने जे काही आंदोलन करावयाचे असते ते त्यांनी केले असून आम्ही त्यांचा सन्मान करतो. सत्तारुढ पक्षाने विरोधी पक्षाचा सन्मान करुन त्यांचे म्हणणे ऐकणे, त्याला उत्तर देणे आणि सर्वसामान्य जनतेपर्यंत संदेश पोहचवणे हे काम असते. आपापल्या पध्दतीने प्रत्येक पक्ष आंदोलन करीत असतो, त्यावर सरकारचे उत्तर येते आणि जनता त्यातून अर्थ काढून आपले मत बनवत असते. मी यामध्ये कधी जास्त लक्ष दिले नाही. काही वेळेला भावना सुध्दा थांबवाव्या लागतात. आम्ही सुध्दा वेलमध्ये येत होतो. आम्ही सभापतींना अगतिक करीत होतो. त्या आसनावर बसल्यानंतर सभापतींनी सत्तारुढ पक्षाच्या माध्यमातून (अडथळा) विरोधी पक्षाचा आदर करणे हा गुन्हा आहे काय ? आपण तीन आठवडयामध्ये जे काम केले त्याबद्दल मी आदरयुक्त विचार मांडत असताना आपल्याला वाईट वाटत असेल तर मी माझे शब्द मागे घेऊ काय ? या ठिकाणी मी प्रथा-परंपरेवरच बोलत आहे. या उच्च सभागृहात माननीय सभापती महोदय, आपण कामकाज सुरु केले, या सभागृहात अनेक वेळा गोंधळात कामकाज झालेले आहे. तो विषय नसतो. परंतु आज हे सर्व होत असताना आपण आपल्या स्थानावरुन सभागृह तहकूब करुन, नंतर आपण आतमध्ये यावायास पाहिजे होते व मग मुख्यमंत्री, उप सभापती आल्यानंतर राष्ट्रगीत होऊन, राष्ट्रगीत सुरु झाले असते तर विरोधी पक्ष सुध्दा शांत झाला असता. परंतु दुर्दैवाने हे सभागृह संस्थगित करुन 9 मार्च रोजी पुढचे अधिवेशन सुरु होईल असे आपण जाहीर केले.(अडथळा)

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य म्हणत आहेत की, असे रेकॉर्डवर नाही. मी असे म्हणतो की, हे सभागृह अर्धा तास बंद करा आणि रेकॉर्ड तपासून कार्यवाही करा. हे सभागृह एकदा संस्थगित झाल्यानंतर कोणत्या नियमाने पुन्हा सुरु झाले आहे ?

...3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे.....

सभागृह संस्थगित झाल्याचे माझ्याकडे रेकॉर्ड आहे. बाहेर जाताना मी उप सचिव श्री.आठवले यांच्याकून माहिती घेतली होती.

**सभापती :** हे बघा नियम वगैरे काही नाही. मी गोंधळावर पडदा टाकण्यासाठी हे सर्व केलेले आहे. (अडथळा) आपण माझे म्हणणे ऐकून घ्या. मी दोन्ही बाजूचे, गेल्या 3 आठवड्यापासून ऐकत आहे. माझे मत असे आहे की, मी जे बोललो आहे, संस्थगित झाले असेल हे शब्द माझ्या तोंडातून निघून गेलेही असेल, मी त्याला नाही म्हणत नाही. परंतु त्याही वेळेस मी म्हणालो होतो की, राष्ट्रगीत सुरु करण्याच्या अगोदर माननीय मुख्यमंत्र्यांना बोलविण्यात यावे व याच नियमाखाली मी पुन्हा बोलवत आहे. तरीही सन्माननीय सभागृह नेते आपण मला बोललात. आपला मान-सन्मान राखणे हे माझेही कर्तव्य आहे. म्हणून सगळयांचा अपवाद करुन आपल्या सर्व मंत्र्यांना मी दिलासा देण्याचा प्रयत्न केला होता. आपल्याकडे पायंडा नसताना आपले लेखी भाषण पटलावर घेण्यास मी तयार आहे. तरीही आपला सन्मान राखण्यासाठी मी म्हणालो की, आपण दोन मिनिटे बोलावे. आता माननीय मुख्यमंत्र्यांकडून मला निरोप येतो आहे. त्यांच्याकडून मला ऑफिशिअली निरोप आलेला नाही. खालच्या सभागृहात बिल सुरु आहे. माननीय मुख्यमंत्री येईपर्यंत आपण 2-4 मिनिटे बोलावे आणि मग आपण राष्ट्रगीत सुरु करु.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, 1984 पासून शेती महामंडळ तोट्यात आहे. या विषयाचे निवेदन मी पटलावर ठेवणार आहे परंतु मी आपल्याला थोडक्यात सांगू इच्छितो की, 1984 पासून शेती महामंडळ तोट्यात होते. 1984 पासून शेती करण्यासाठी आतापर्यंत 128 कोटी रकमेचे कर्ज काढले गेले. कर्ज काढून शेती केली गेली. या कर्जावरील व्याज 143 कोटी रुपये भरले आहे. म्हणजे कर्ज काढायचे, व्याज भरावयाचे आणि शेती करावयाची हे मागच्या वर्षापर्यंत सुरु होते. आमचे सरकार आल्यानंतर आम्ही पहिल्यांदा निर्णय घेतला की, शेती महामंडळाची जमीन ही ई-टेंडरने, ई-ऑक्शनने लिलाव करावयाचा आणि त्या प्रमाणे लिलाव करण्याच्या संदर्भात 3 प्रमुख वृत्तपत्रामध्ये जाहिराती दिल्या. त्यामधून पुढची कार्यवाही ई-ऑक्शन पध्दतीने केली. त्याचे लहान लहान तुकड्याच्या ऐवजी आम्ही मोठे तुकडे केले. त्याला चांगला प्रतिसादही मिळाला. आज पहिल्यांदा 1984 पासून ते आजपर्यंत पहिले वर्ष असे आहे की, हे महामंडळ आज 43 कोटी रुपयांच्या नफ्यात आहे. हे शेती महामंडळ पहिल्यांदा नफ्यात आले आहे. एक रुपयाचे कर्ज न

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे.....

घेता हे महामंडळ आम्ही नफ्यात आणले. आपले म्हणणे आहे की, सिलिंग ॲक्टचा भंग झाला आहे. महामंडळ असल्यामुळे सिलिंगचा विषय येत नाही. व्यक्तिगतसाठी सिलिंग लागत असते. महामंडळासाठी सिलिंग लागत नाही. परंतु तरीही या ठिकाणी आपण सिलिंग ॲक्टचा भंग केलेला नाही. आता प्रश्न असा आहे की, यामध्ये गैरव्यवहार झाला. गैरव्यवहार झाला की, न झाला. म्हणून 1984 पासून आजपर्यंत यासंदर्भात जी जी काही अनियमितता झाली, याला तोटे का आले, कर्ज का काढावे लागले, ही जमीन कोणाच्या ताब्यात होती, कोणाच्या सूचनेमुळे ही जमीन पडीत राहिली, कोणाच्या सूचनेनुसार जमीन विकली गेली याबाबतची चौकशी ॲन्टी करप्शन डिपार्टमेंटकडून आणि इकॉनॉमी विंग कडून तसेच आवश्यकता भासल्यास उच्चस्तरीय समिती नेमून या सर्व व्यवहाराची चौकशी करुन हा अहवाल कार्यवाही सहीत, एटीआरसह सभागृहाच्या पटलावर ठेवून आम्ही त्याप्रमाणे कार्यवाही करणार आहोत.

**सभापती :** बाकीच्या मंत्री महोदयांच्या संदर्भात मी सूचना आणि आदेशही दिले आहेत की, हे सर्व पटलावर ठेवा.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आम्हाला दोन दोन मिनिटे बालण्याची संधी द्यावी अशी विनंती आहे.

**सभापती :** आता कोणालाही संधी मिळणार नाही. या सत्र काळातील कामकाजाचा आढावा मी पटलावर ठेवत आहे.

( प्रेस : कृपया येथे जोडलेला कामकाजाचा आढावा छापावा.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.:** पुढील अधिवेशनासंबंधी घोषणा.

**सभापती** : मी खालील घोषणा करतो :-

महाराष्ट्र विधानपरिषदेचे पुढील अधिवेशन बुधवार, दिनांक 09 मार्च, 2016 रोजी विधान भवन, मुंबई येथे घेण्यात येईल.

-----

**पृ.शी./मु.शी.:** सत्र समाप्तीची घोषणा.

**सभापती** : सभागृहाचे कामकाज आता संपले आहे. आता मी सत्र समाप्ती संबंधीचा माननीय राज्यपालांचा संदेश वाचून दाखवितो.

"मी चे.विद्यासागर राव महाराष्ट्राचे राज्यपाल भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 174 खंड (2) उपखंड (क) द्वारे मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन याद्वारे बुधवार, दिनांक 23 डिसेंबर, 2015 रोजी होणाऱ्या सभागृहाच्या बैठकीच्या समाप्तीबरोबर महाराष्ट्र विधानपरिषदेचे अधिवेशन संस्थगित करीत आहे."

आता राष्ट्रगीत गाईले जाईल व त्यानंतर सत्र संस्थगित होईल, असे मी घोषित करतो.

(यानंतर राष्ट्रगीत झाले)

( दुपारी 2 वाजून 41 मिनिटांनी सत्र संस्थगित झाले)

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही